Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/माध्य/उमा/३९९८
दिनांक : ३१/१२/२०२४

प्रति,
प्राचार्य व मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय :- इ. १० वी व इ.१२ वी परीक्षा फेब्रु -मार्च २०२५ साठी मुख्याध्यापक व प्राचार्य यांची ऑनलाईन आढावा सभा**

संदर्भ:- १) क्र.कोविमं/माध्य/उमा/परीक्षा-३७५४ दि.०६/१२/२०२४.
२) प्राचार्य व मुख्याध्यापक यांच्या सहविचार सभा दि.११, १२ व १७/१२/२०२४ रोजी देण्यात आलेल्या सूचना
३) या कार्यालयाचे जा.क्र.कोविमं/माध्य./उमा./३८६२ दि.१८/१२/२०२४ चे पत्र
४) या कार्यालयाचे जा.क्र.कोविमं/माध्य./उमा./३८६१ दि.१८/१२/२०२४ चे पत्र
५) प्राचार्य व मुख्याध्यापक यांची दि.२३/१२/२०२४ ची ऑनलाईन आढावा सभा

उपरोक्त विषयी पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, चालू शैक्षणिक वर्षात इ.१०वीची लेखी परीक्षा दि.२१/०२/२०२५ ते दि.१७/०३/२०२५ व इ.१२वीची लेखी परीक्षा दि.११/०२/२०२५ ते १८/०३/२०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. सदर परीक्षेसाठी विभागीय मंडळाकडून परीक्षा केंद्रांची निश्चिती झालेली आहे.

परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधांची उपलब्धता असणे आवश्यक आहे, त्याबाबत सविस्तर सूचना प्राचार्य / मुख्याध्यापक जिल्हानिहाय सहविचार सभेमध्ये तसेच ऑनलाईन बैठकीमध्ये देण्यात आलेल्या आहेत. विभागीय मंडळाच्या वतीने गैरमार्गमुक्त परीक्षा अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे त्यास अनुसरुन मुख्याध्यापक ऑफलाईन व ऑनलाईन बैठका, शाळास्तरावर शिक्षक / पालक / विद्यार्थी उद्‌बोधन सभा, कॉपी न करण्याची शपथ विद्यार्थ्यांना दोन टप्प्यात देणे, शिक्षासुची विषयी अवगत करणे असे उपक्रम घेण्यात येत आहेत. शिवाय अभ्यासाचे नियोजन, परीक्षापुर्व व परीक्षाकाळात विद्यार्थ्यांनी घ्यायचा आहार व आरोग्याबाबतची काळजी, ताणतणावाबाबतचे व्यवस्थापन, उत्तरपत्रिका अचुकपणे लिहणे इ.बाबतही जिल्हानिहाय ऑफलाईन / ऑनलाईन उद्‌बोधन वर्ग घेण्यात येत आहेत.

एकंदरीतच परीक्षेसाठी विद्यार्थी / पालक / शिक्षक आणि परीक्षा घेणाऱ्या सर्व यंत्रणेतील घटक यांची सर्व समावेशक तयारी होणे आवश्यक आहे. त्याबरोबरच गैरमार्गमुक्त / कॉपीमुक्त परीक्षा आयोजनासाठी परीक्षा केंद्र असलेल्या ज्या शाळांना शक्य आहे त्या शाळेतील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही बसविणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. **प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही बसविणेबाबत सक्ती नाही.**

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार यापुर्वी सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत त्याचा वेळोवेळी ऑनलाईन पध्दतीने आढावा घेण्यात येणार आहे. **शुक्रवार, दि.०३/०१/२०२५ रोजी दु.३.०० ते ५.०० या**

कालावधीत ऑनलाईन आढावा सभा आयोजित करण्यात येत आहे. या सभेची लिंक Whatsapp ग्रुपवर देण्यात येईल.

सभेस प्राचार्य / मुख्याध्यापक यांनी स्वत: अद्ययावत माहितीसह उपस्थित राहावे. ऑनलाईन सभेस Join होताना आपले नाव, पदनाम व ठिकाण नमूद करणे आवश्यक आहे. सभेत पुढील विषयांसह अन्य महत्त्वपुर्ण विषयांवर चर्चा करण्यात येईल. सभेत कोणत्याही प्राचार्य / मुख्याध्यापक यांना आढावा देण्यासाठी निर्देशित केले जाईल. त्यासाठी प्रश्नावलीतील अचुक माहिती सोबत ठेवून आढावा द्यावा. या बैठकीच्या तयारीची माहिती या कार्यालयास पाठविण्याची आवश्यकता नाही.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

**मा.वि.अध्यक्ष यांच्या मान्यतेने**

**सोबत** - प्रश्नावली

प्रत - १.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
२. शिक्षणाधिकारी (माध्य.), सातारा, सांगली व कोल्हापूर -
सदर ऑनलाईन आढावा सभेस आपणही उपस्थित राहावे व आपल्या स्तरावरुन सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य यांना सदर सभेस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे.

# प्रश्नावली

१) शाळास्तरावर शिक्षक / पालक / विद्यार्थी यांच्या बैठकीबाबत

I. बैठक घेतल्याचा दिनांक

II. बैठकीस पालकांची उपस्थिती

III. विद्यार्थ्याला शिक्षासुची व उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठामागील सूचना वाचून दाखविल्या आहेत का ?

IV. बैठकीचे इतिवृत्त व उपस्थितीपत्रक उपलब्ध आहे का ?

V. कॉपीमुक्तीबाबतची शपथ / प्रतिज्ञा विद्यार्थ्यांना देण्यात आलेली आहे का ? व सहभागी विद्यार्थी संख्या.

VI. उपक्रमाचे फोटो / व्हिडिओ व माहिती विभागीय मंडळाच्या kopboardexam25@gmail.com या मेलआयडी वर पाठविल्या आहेत का ?

२) उल्लास नवभारत कार्यक्रमांतर्गत सद्यस्थिती

I. शाळेस मिळालेले चालू वर्षाचे असाक्षर नोंदणी उदिष्ट

II. झालेली एकूण नोंदणी

III. स्वयंसेवकांची झालेली एकूण नोंदणी

IV. इ.८ वी ते इ.१२ वीमधील नोंदविलेले स्वयंसेवकांची संख्या

३) विभागीय मंडळाकडे भरावयाच्या शुल्काबाबतची स्थिती

I. नोंदणी शुल्क

II. शिक्षण संक्रमण वर्गणी

४) राज्यमंडळने विकसित केलेल्या मोबाईल ॲपबाबत

I. बैठकीत ॲपची सविस्तर माहिती देण्यात आली काय ?

II. शाळेतील शिक्षक कर्मचारी यांनी ॲप डाऊनलोड केले काय ? व संख्या.

III. शाळेतील इ.१०वी / इ.१२वी विद्यार्थी व पालक यांनी ॲप डाऊनलोड केले काय ? व संख्या.

५) आपल्या शाळा / क.महाविद्यालयातील सीसीटीव्ही यंत्रणेची स्थिती.

I. एकूण सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या

II. कार्यान्वीत / चालू स्थितीतील कॅमेऱ्यांची संख्या

६) शाळा / क.महाविद्यालय सांकेतांक नुतनीकरणाबाबत

I. कोणत्या वर्षी अखेरचे नुतनीकरण केलेले आहे ?

II. चालु वर्षासाठीचा प्रस्ताव शुल्कासह सादर केलेला आहे काय ? असल्यास दिनांक.

७) राज्यमंडळ, पुणे यांची http//mahahsscboard.in/mr या संकेतस्थळावर जाऊन school profile माहिती अद्ययावत भरली आहे का ? होय /नाही. नसल्यास त्यासंबधी कारणे व अडचणी.

८) इ.१०वी व इ.१२वी फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेसाठी परीक्षक / नियामक नियुक्ती संदर्भात शिक्षक पॅनल माहिती विभागीय मंडळ कार्यालयास दिली आहे का ? होय / नाही. असल्यास दिनांक.

९) इ.१०वी व इ.१२वी फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं.१७) ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज शाळा / क.महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत का ? होय / नाही

१०) इ.१०वी व इ.१२वी फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेची तोंडी, प्रात्यक्षिक, अंतर्गत मुल्यमापन, प्रकल्प, प्रयोगवही सुस्थितीत अभिलेख जतन करुन ठेवले आहे काय ? होय / नाही

११) इ.१०वी व इ.१२वी फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेचे परीक्षक / नियामक / प्रात्यक्षिक / केंद्रसंचालक व अन्य देयके विभागीय मंडळाकडे प्रलंबित आहेत का ? होय / नाही

१२) शाळा व कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांची अभ्यासाची उजळणी घेतली का ? सराव, उद्बोधन वर्ग घेणे या संदर्भात नियोजन करण्यात आले का ?

१३) विविध प्रस्तावाबाबत सद्दस्थिती

I. दिव्यांग विद्यार्थी प्रस्ताव

II. आवेदनपत्र रद्द प्रस्ताव

III. चित्रकला, शास्त्रीय कला व लोककला प्रस्ताव

IV. खेळाडू प्रस्ताव

१४) परीक्षा केंद्र असलेल्या शाळा / क.महाविद्यालयात आवश्यक असलेल्या सुविधा - परीक्षार्थी संख्येच्या प्रमाणात वर्गखोल्या, आवश्यक संख्येइतके बेंचेस, वीजदिवे, पंखे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहाची उपलब्धता, संरक्षक भिंत, खिडक्यांची दुरुस्ती व जाळी बसविणे, वीजेसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटर अथवा इनव्हर्टर, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्पची सुविधा इ. यांची उपलब्धता आहे

१५) इ.१०वी व इ.१२वी फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेची केंदसंचालक माहिती शिक्षणाधिकारी(माध्य.) यांचेकडे सादर केलेली आहे का ? सादर केली असल्यास दिनांक.